**त्रिपुरा मध्ये बांगलादेश नागरिकांच्या संबंधित घटनेवर माध्यम उपस्थित शंकावर अधिकृत प्रवक्त्यांची प्रतिक्रिया**

17 ऑक्टोबर 2025

त्रिपुरा मध्ये बांगलादेश नागरिकांच्या संबंधित घटनेवर माध्यम उपस्थित शंकावर अधिकृत प्रतिक्रिया व्यक्त करताना अधिकृत प्रवक्ते श्री. रणधीर जैस्वाल म्हणाले,:

आम्ही त्रिपुरा येथे 15 ऑक्टोबर 2025 रोजी भारतीय भू-प्रदेशात सुमारे 3 किमी आत तीन बांगलादेशी तस्करांच्या मृत्यू प्रकरणाची नोंद घेतली आहे.

बांगलादेश मधील तीन उपद्रवींनी आंतरराष्ट्रीय सीमेचे उल्लंघन केले. भारतीय प्रदेशातील बिद्याबिल गावातून पशुधनाची चोरी करण्याचा प्रयत्न केला. उपद्रवींनी स्थानिक गावकऱ्यांवर लोखंडी सळई आणि चाकूच्या सहाय्याने हल्ला केला. यामध्ये एका स्थानिक गावकऱ्याचा मृत्यू झाला. यावेळी अन्य गावकऱ्यांनी धाव घेऊन उपद्रवींना प्रतिबंध करण्याचा प्रयत्न केला.

संबंधित अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली असता दोन तस्कर मृतावस्थेत आढळून आले. तिसऱ्या गंभीर जखमी अवस्थेतील तस्कराचा समान दिवशी रुग्णालयात मृत्यू झाला. या तिघांचे मृतदेह बांगलादेशकडे सोपविण्यात आले आहेत. पोलिसांनी गुन्ह्याची नोंद केली आहे.

आंतरराष्ट्रीय सीमेचा आदर राखण्यासाठी आणि सीमापार गुन्हे आणि तस्करीला आळा घालण्यासाठी आवश्यक ठिकाणी सीमा तटबंदी करण्यास बांगलादेशने सहकार्यात्मक उचित पावले उचलण्याची गरज या घटनेमुळे पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.

**नवी दिल्ली**

17 ऑक्टोबर 2025